## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने प्रा. राकेश रामटेके यांचे विशेष व्याख्यान झाले.

यावेळी "व्यक्तिमत्व विकासात डॉ. आंबेडकर विचारधारेची भूमिका" या विषयावर बोलतांना प्रा. रामटेके म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडलेली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन आपले व्यक्तिमत्व घडविले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे देशात अनेक आयएएस, आयएफएस अधिकारी, विचारवंत, लेखक- साहित्यिक निर्माण झाले आहेत. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही अनेक कुशल नेतृत्व निर्माण झाले त्याचबरोबर उद्योग क्षेत्रातही अनेकांनी आपले व्यक्तिमत्त्वानीं स्वतःला सिद्ध केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानातून प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन प्रा. राकेश रामटेके यांनी केले.

यावेळी डॉ. विजय घोरपडे, डॉ. मनोज इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती तर अजय महाले, तथागत सुरवाडे, सुकन्या जाधव, जयवर्धन तायडे, राजेंद्र तायडे, सचिन धुंदले, चंपा खोब्रागडे , अमित पावरा आदी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रस्ताविक डॉ विजय घोरपडे यांनी तर विद्यार्थिनी कु. सुकन्या जाधव हिने आभार व्यक्त केले.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे आयोजित आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग व आंतर महाविद्यालयीन दिव्यांग महोत्सवाच्या विविध स्पर्धांच्या प्रवेशिका ऑनलाईन सादर करण्याची मुदत दि. १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन सादर केलेल्या प्रवेशिकांची हार्ड कॉपी जमा करण्यासाठी दि. २१ ऑक्टोबर २०२४ ही अंतीम मुदत देण्यात आली आहे. या संदर्भातील विस्तृत माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आली असल्याची माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली आहे.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी